सकाळ

# कोकणातील वादळग्रस्तांना 'रवळनाथ' संस्थेकडून मदत

## कर्जदार सभासद; तौक्ते चक्रीवादळाचा तडाखा बसून नुकसान

गडहिंग्लज, ता. २३ : तौक्ते चक्रीवादळाचा तडाखा बसून नुकसान झालेल्या मालवण येथील सुनीलदत्त कांदळगावकर (कोळंब) आणि सागर मिशाळ (कुंभारमाठ) या दोन कर्जदार सभासदांना श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे आर्थिक मदत देण्यात आली.

आठवड्यापूर्वी तौक्ते चक्रीवादळाने सिंधुदुर्ग जिल्ह्यात धुमाकूळ घातला. त्यामुळे मालवण किनारपट्टीलगतच्या गावातील घरांवर झाडे पडून बागायतदार, मच्छीमार यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यात कांदळगावकर यांच्या रिसॉर्टचे नेट वाहून गेले, घरावर झाड पडले, तर मिशाळ यांच्या घराची कौले उडाली आणि फळझाडांची कलमे जमीनदोस्त झाली. त्याची माहिती मिळताच रवळनाथ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी तत्काळ धाव घेऊन आपल्या कर्जदार सभासदांना आर्थिक मदत केली. या वेळी चौगुले म्हणाले, "रवळनाथ ही घरांसाठी कर्ज देणारी संस्था आहे. त्यामुळे कर्तव्य भावनेतूनच चक्रीवादळाने नुकसान झालेल्या सभासदांना संस्थेतर्फे मदत दिली आहे." यावेळी कांदळगावकर व मिशाळ म्हणाले, "चक्रीवादळ होऊन आठवडा उलटला तरी कुणाकडूनही मदत मिळाली नव्हती. श्री रवळनाथ संस्थेकडून पहिली मदत मिळाली. त्यामुळे आम्ही भारावून गेलो आहोत."



मालवण : तौक्ते चक्रीवादळात नुकसानग्रस्त सुनीलदत्त कांदळगावकर यांना एम. एल. चौगुले यांच्या हस्ते मदत देण्यात आली. या वेळी सी.ए. सागर तेली, प्राचार्य मनोहर गुरबे, विक्रम जांभेकर आदी.

या वेळी कुडाळ शाखा सल्लागार आणि कुडाळ हायस्कूल, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य मनोहर गुरबे, सी. ए. सागर तेली, शाखाधिकारी विक्रम जांभेकर उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
24/05/2021 Page No. 4

पुढारी



**मालवण : तोक्ते चक्रीवादळामुळे नुकसान झालेले सुनीलदत्त कांदळकर यांना मदत देताना रवळनाथ संस्थेचे अध्यक्ष एम. एल. चौगुले. सोबत सीए सागर तेली, मनोहर गुरबे, विक्रम जांभेकर आदी.**

# कोकणातील वादळग्रस्तांना रवळनाथ संस्थेकडून मदत

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

तोक्ते चक्रीवादळाचा तडाखा बसून नुकसान झालेल्या मालवण येथील सुनीलदत्त कांदळगावकर (कोळंब) आणि सागर मिशाळ (कुंभारमाठ) या दोन कर्जदार सभासदांना आजरा येथील रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे (मल्टिस्टेट) आर्थिक मदत देण्यात आली. आठवड्यापूर्वी तोक्ते चक्रीवादळाने सिंधुदुर्ग जिल्ह्यात धुमाकूळ घातला. त्यामुळे मालवण किनारपट्टीलगतच्या गावातील घरांवर झाडे पडून बागायतदार, मच्छीमार यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्याची माहिती मिळताच संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी तत्काळ धाव घेऊन आपल्या कर्जदार सभासदांना तत्काळ आर्थिक मदत केली.

यावेळी चौगुले म्हणाले, 'रवळनाथ' ही घरांसाठी कर्ज देणारी संस्था आहे. त्यामुळे कर्तव्य भावनेतूनच चक्रीवादळाने नुकसान झालेल्या सभासदांना संस्थेतर्फे मदत दिली आहे. यावेळी कांदळगावकर व मिशाळ म्हणाले, चक्रीवादळ होऊन आठवडा उलटला तरी कुणाकडूनही मदत मिळाली नव्हती. रवळनाथ संस्थेकडूनच पहिली मदत मिळाली. त्यामुळे आम्ही भारावून गेलो आहोत.

यावेळी कुडाळ शाखा सल्लागार आणि कुडाळ हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य मनोहर गुरबे, सी. ए. सागर तेली, शाखाधिकारी विक्रम जांभेकर उपस्थित होते.

**कौले उडाली, कलमे जमीनदोस्त!**

कांदळगावकर यांच्या रिसॉर्टचे नेट वाहून गेले. घरावर झाड पडले. मिशाळ यांच्या घराची कौले उडाली आणि फळझाडांची कलमे जमीनदोस्त झाली आहेत. त्यांना रवळनाथ सोसायटीकडून तत्काळ आर्थिक मदत देण्यात आली.

My Kolhapur Edition
May 23, 2021 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

तरुण भारत
सोमवार, २४ मे २०२१

# कोकणातील वादळग्रस्तांना 'रवळनाथ' सोसायटीची मदत



**मालवण : सुनिलदत्त कांदळगावकर यांना मदत देताना एम. एल. चौगुले. शेजारी सागर तेली व अन्य मान्यवर.**

**गडहिंग्लज :** तौक्ते चक्रीवादळाचा तडाखा बसून नुकसान झालेल्या मालवण येथील सुनिलदत्त कांदळगावकर (कोळंब) आणि सागर मिशाळ (कुंभारमाठ) या दोन कर्जदार सभासदांना येथील रवळनाथ को-ऑप हौसिंग सोसायटीने आर्थिक मदत दिली आहे. संस्थेचे अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते मदतीचा धनादेश देण्यात आला. तौक्ते चक्रीवादळाने सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोठे नुकसान केले आहे. मालवण किनारपट्टीच्या गावातूनही याचा फटका बसला असून बागायतदार, मच्छीमार यांचे नुकसान झाले आहे. संस्थेच्या कर्जदार, सभासदांचे नुकसान झाल्याचे समजाताच अध्यक्ष चौगुले यांनी तिथे भेट देवून पाहणी करत मदत केली आहे. कर्तव्य भावनेतून चक्रीवादळातून नुकसान झालेल्या सभासदांना संस्थेने मदत केल्याचे सांगितले. यावेळी श्री. कांदळगावकर, श्री. मिशाळ यांनी चक्रीवादळाने आपले मोठे नुकसान झाले आहे. पण अद्यापही कोणी मदत दिली नाही. 'रवळनाथ'ने पहिल्यांदा मदत दिल्याने आपण भारावून गेलो आहोत. यावेळी कुडाळ शाखा सल्लागार प्राचार्य मनोहर गुरबे, सागर तेली, शाखाधिकारी विक्रम जांभेकर आदी उपस्थित होते.

सकाळ

# कर्जदार नुकसानग्रस्तांना 'रवळनाथ'चा आधार

## चक्रीवादळामुळे आर्थिक मदत; मालवणातील लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटले हास्य

सकाळ वृत्तसेवा

कुडाळ, ता. २१ : मालवण येथे तौक्ते चक्रीवादळाचा तडाखा बसून नुकसान झालेल्या कर्जदार सभासदांच्या मदतीला सर्वप्रथम कुडाळ येथील रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटी ही आर्थिक मदतीसाठी धावली. सर्वप्रथम या संस्थेने मदतीचा आधार दिल्याने लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमटले.

सहा दिवसांपूर्वी सिंधुदुर्ग जिल्ह्यात तौक्ते चक्रीवादळाने धुमाकूळ घातला. विशेषतः जिल्ह्यात सर्वत्र हे वादळ २० ते २२ तास सुरू होते. सर्वांनाच या चक्रीवादळाचा जोरदार तडाखा बसला. मालवण किनारपट्टीलगत असणाऱ्या गावातील घरांवर झाडे पडून बागायतदार, मच्छीमार यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. याबाबतची माहिती श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीला मिळताच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी तत्काळ धाव घेत या कर्जदार सभासदांना आर्थिक मदत केली. यावेळी श्री. चौगुले म्हणाले, 'रवळनाथ हौसिंग सोसायटी ही घरासाठी कर्ज देणारी संस्था असल्यामुळे जे जे आमचे कर्जदार सभासद आहेत त्यांची यादी आम्ही काढली. ज्या सभासद कर्जदारांचे नुकसान झाले त्यापैकी सुनील दत्त कांदळगावकर कोळंब व कुंभारमाठ मालवण येथील सागर मिशाळ या दोघांना आर्थिक मदत केली.

कांदळगावकर यांचे रिसॉर्टला असणारे जाळे वाहून गेले घरावर झाड पडले तर सागर मिशाळ यांच्या घराची कौले उडाली कलमे जमीनदोस्त झाली. यावेळी मदत प्रसंगी येथील शाखेचे संचालक व कुडाळ हायस्कूलचे मुख्याध्यापक मनोहर गुरबे, संचालक सीए सागर तेली, शाखाधिकारी विक्रम जांभेकर उपस्थित होते.

### रवळनाथचा सर्वप्रथम आधार

यावेळी कांदळगावकर व मिशाळ म्हणाले, 'या वादळी तडाख्याने आमचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. एवढे दिवस होऊनही कोणीच मदतीसाठी आले नाही. सर्वप्रथम श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी धावून आली. आर्थिक मदत मिळाल्याने अक्षरशः भारावून गेलो.



**मालवण : येथे चक्रीवादळाचा तडाखा बसून नुकसान झालेल्या कर्जदार सभासदांना मदत देताना एम. एल. चौगुले. सोबत सागर तेली, मनोहर गुरबे, विक्रम जांभेकर आदी. (छायाचित्रे : अजय सावंत)**

Sindhudurg, Main
22/05/2021 Page No. 2

सकाळ



मालवण : तौक्ते चक्रीवादळात नुकसानग्रस्त सुनीलदत्त कांदळकर यांना एम. एल. चौगुले यांच्या हस्ते मदत देण्यात आली. या वेळी सी.ए. सागर तेली, प्राचार्य मनोहर गुरबे, विक्रम जांभेकर आदी.

# कोकणातील वादळग्रस्तांना 'रवळनाथ' संस्थेकडून मदत

## कर्जदार सभासद; चक्रीवादळाचा तडाखा बसून नुकसान

गडहिंग्लज, ता. २३ : तौक्ते चक्रीवादळाचा तडाखा बसून नुकसान झालेल्या मालवण येथील सुनीलदत्त कांदळगावकर (कोळंब) आणि सागर मिशाळ (कुंभारमाठ) या दोन कर्जदार सभासदांना श्री. रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे आर्थिक मदत देण्यात आली.

नुकसानीची माहिती मिळताच रवळनाथ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी तत्काळ धाव घेऊन कर्जदार सभासदांना आर्थिक मदत केली. या वेळी चौगुले म्हणाले, "रवळनाथ ही घरांसाठी कर्ज देणारी संस्था आहे. त्यामुळे कर्तव्य भावनेतूनच चक्रीवादळाने नुकसान झालेल्या सभासदांना संस्थेतर्फे मदत दिली आहे." या वेळी कांदळगावकर व मिशाळ म्हणाले, "चक्रीवादळ होऊन आठवडा उलटला तरी कुणाकडूनही मदत मिळाली नव्हती. रवळनाथ संस्थेकडून पहिली मदत मिळाली. त्यामुळे आम्ही भारावून गेलो आहोत." या वेळी कुडाळ शाखा सल्लागार प्राचार्य मनोहर गुरबे, सागर तेली, शाखाधिकारी विक्रम जांभेकर उपस्थित होते.

Belgaum, Main
24/05/2021 Page No. 2

लोकमत

# नुकसानग्रस्तांच्या मदतीला रवळनाथ सोसायटी धावली

लोकमत न्यूज नेटवर्क

कुडाळ : मालवण येथे तौक्ते चक्रीवादळाचा तडाखा बसून नुकसान झालेल्या कर्जदार सभासदांच्या आर्थिक मदतीला सर्वप्रथम कुडाळ येथील रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी धावली. सर्वप्रथम या संस्थेने मदतीचा आधार दिल्याने लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमटले.

सहा दिवसांपूर्वी सिंधुदुर्ग जिल्ह्यात तौक्ते चक्रीवादळाने धुमाकूळ घातला. विशेषत: जिल्ह्यात सर्वत्र हे वादळ २० ते २२ तास सुरू होते. सर्वांनाच या चक्रीवादळाचा जोरदार तडाखा ब सला. मालवण किनारपट्टीलगत असणाऱ्या गावातील घरांवर झाडे पडून बागायतदार, मच्छिमार यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. याबाबतची माहिती श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीला मिळताच संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी तात्काळ धाव घेत या कर्जदार सभासदांना आर्थिक मदत केली.

यावेळी बोलताना चौगुले म्हणाले, रवळनाथ हौसिंग सोसायटी ही घरासाठी कर्ज देणारी संस्था असल्यामुळे जे जे आमचे कर्जदार सभासद आहेत, त्यांची यादी आम्ही



मालवण येथे तौक्ते चक्रीवादळाचा तडाखा बसून नुकसान झालेल्या कर्जदार सभासदांना मदत देण्यात आली. यावेळी एम. एल. चौगुले, सागर तेली, मनोहर गुरबे, विक्रम जांभेकर आदी उपस्थित होते.

## 'रवळनाथ'ने सर्वप्रथम आधार दिला

यावेळी बोलताना सुनीलदत्त कांदळगावकर व मिशाळ म्हणाले, या चक्रीवादळी तडाख्याने आमचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. एवढे दिवस होऊनही कोणीच मदतीसाठी आले नाही. सर्वप्रथम श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी धावून येऊन आम्हाला आधार दिला, असे सांगत आम्ही अक्षरशः भारावून गेल्याचे त्यांनी सांगितले.

काढली. ज्या सभासद कर्जदारांचे नुकसान झाले,

त्यापैकी सुनीलदत्त कांदळगावकर, कोळंब व सागर मिशाळ, कुंभारमाठ, मालवण या दोघांना आम्ही तात्काळ आर्थिक मदत केली. सुनीलदत्त कांदळगावकर यांचे रिसॉर्टला असणारे नेट वाहून गेले, घरावर झाड पडले, तर सागर मिशाळ यांच्या घराची कौले उडाली, कलमे जमीनदोस्त झाली, असे सांगितले. यावेळी मदतप्रसंगी येथील शाखेचे संचालक व कुडाळ हायस्कूलचे मुख्याध्यापक मनोहर गुरबे, संचालक सीए सागर तेली, शाखाधिकारी विक्रम जांभेकर उपस्थित होते.